सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५६ | गुरुवार, दि. २० नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
२० नोव्हेंबर

- कल्पना चावला, पहिल्या भारतीय महिला अंतराळवीर, यूएस स्पेस शटल कोलंबियावर बसून तिची पहिली अंतराळ मोहीम सुरू केली.
- अनाथ आणि निराधार मुलांच्या क्षेत्रात केलेल्या कार्यासाठी लता जोशी यांना प्रतिष्ठित हॅरी होल्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**
**जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# अमळनेरला निवडणूक प्रशासन निष्क्रिय?

## स्थिर सर्वेक्षण पथके गायब झाल्याने तपासणी पूर्णपणे ठप्प

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथे नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच निवडणूक प्रशासनाच्या निष्क्रियतेचे चित्र समोर आले आहे. अमळनेर शहरात एकूण आठ स्थिर सर्वेक्षण पथकांची आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्षात ही पथके कार्यरत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. स्थिर राहून तपासणी करायची असलेली पथके अक्षरशः अस्थिर आणि गायब झाल्याचे निदर्शनास आले आहे.



**स्थिर पथके अनुपस्थित; तपासणी ठप्प**

निवडणुकीदरम्यान रोख रक्कम, दारू, बेकायदेशीर साहित्य किंवा मतदारांना प्रभावित करणारी कोणतीही वस्तू वाहतुकीतून जाऊ नये, यासाठी स्थिर सर्वेक्षण पथकांना महत्त्वाची जबाबदारी दिलेली असते. परंतु अमळनेरमधील धुळे रोड आणि गलवाडे रोडवरील स्थिर चौक्यांची पाहणी केली असता सकाळी उशिरापर्यंत एकही कर्मचारी उपस्थित नसल्याचे दिसून आले.

**ओसाड पडलेल्या चौक्या**

नियंत्रणासाठी एकही कर्मचारी नसल्यामुळे वाहनांची तपासणी न करता वाहतूक सुरू होती. निवडणुकीसारख्या संवेदनशील काळात अशी निष्काळजी भूमिका पाहून अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

**पथकेच नसतील तर आचारसंहितेचा अर्थ काय?**

निवडणूक काळात प्रशासनाने शिस्त आणि पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक असताना पथके हजर नसणे हा गंभीर प्रकार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आचारसंहिता लागू आहे, पथकांना सक्त तपासणीचे आदेश आहेत, पण प्रत्यक्षात तपासणीच नाही. मग नियमनाचा उद्देश काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**निवडणूक विभागावर निष्क्रियतेचे आरोप**

या प्रकरणातून अमळनेर निवडणूक विभागाची उदासीनता उघड झाल्याचे चित्र आहे. पथकांवरील नियंत्रणाचा अभाव, पर्यवेक्षणाची कमतरता आणि नियोजनातील त्रुटी यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**त्वरित कारवाईची मागणी**

या गंभीर दुर्लक्षावर निवडणूक आयोगाने तातडीने लक्ष घालावे, पथकांची पुन्हा तपासणी करावी, गैरहजर कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आणि कडक नियंत्रण यंत्रणा उभी करावी, अशी मागणी होत आहे.

## असाही योगायोग...!

पेशवाई काळात तीन कारभारी होते
1) नाना फडणवीस
2) महादजी शिंदे
3) उदाजी पवार
आणि आता पुन्हा त्याच आडनावांची लोक सत्तेत आहेत-
1) देवेंद्र फडणवीस
2) एकनाथ शिंदे
3) अजीत पवार

**याला योगा योग म्हणावे की इतिहासाची पुनरावृत्ती?**

## छाननी पूर्ण; आता लक्ष माघारीकडे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेसाठी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल झाले. त्यानंतर दाखल अर्ज छाननीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे आता सर्वांचे अर्ज माघारीकडे लक्ष लागले आहे. अपक्ष उमेदवारांची संख्या कमी करण्यासाठी आणि मतविभाजन रोखण्यासाठी आघाडी व पक्षांचे नेते कशी मनधरणी करतात, याकडे सर्वांचा कटाक्ष आहे. अपक्ष उमेदवार मैदानात राहिल्यास मतांची विभागणी होऊ शकते. त्यामुळे त्यादृष्टीनेही खलबते सुरू झाली असून, तशा हालचाली गतिमान झाल्या आहेत.

# अमळनेर पालिका निवडणूक

## आमचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार ‘ कोहिनूर हिरा ’

### माजी आमदार शिरीषदादा चौधरी : नगरसेवकपदासाठी ३३ जणांना अधिकृत उमेदवारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पालिका निवडणुकीसाठी शिवसेनेतर्फे नगराध्यक्षपदाचा उमेदवार म्हणून डॉ. परीक्षित बाविस्कर यांना पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. यासोबतच नगरसेवकपदासाठी पक्षाच्या ३३ उमेदवारांकडून अधिकृत उमेदवार म्हणून अर्ज दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये शिवसेनेचे ३०, आघाडीतील २ आणि पुरस्कृत १ अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे, अशी माहिती माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शिवसेना तालुकाध्यक्ष सुरेश अर्जुन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा. डॉ. के. डी. पाटील, डॉ. परीक्षित बाविस्कर, प्रवीण पाठक यांच्यासह इच्छुक उमेदवार उपस्थित होते. श्री. चौधरी म्हणाले, की पालिकेत शिवसेनेचा झेंडा फडकविण्याचा आमचा मानस आहे. त्यादृष्टीने आम्ही सर्वसमावेशक धोरण अंगीकारत पायाभूत कामे सुरू केली आहेत. त्यासाठी सर्व सहकाऱ्यांना विश्वासात



घेऊन रणनीतीही आखत आहोत. आमच्याकडे प्रत्येक प्रभागासाठी सक्षम उमेदवार आहेत. नगराध्यक्षपदासाठी शिवसेनेचा उमेदवार कोण असेल? याबद्दल दीर्घकाळ विचार-विनिमय सुरू होता. मात्र, आता आम्ही जाहीर केलेला उमेदवार ‘ कोहिनूर हिरा ’ आहे. त्यामुळे आमचा उमेदवार निश्चितपणे मोठ्या मतांनी निवडून येईल, असा विश्वास आहे.

डॉ. बाविस्कर यांनी अमळनेरमध्ये शिक्षण घेतलेले आहे. त्यांचे संपूर्ण कुटुंबही याच शहरात आहे. ‘ कोरोना ’च्या काळात त्यांनी आरोग्यदूत म्हणून रुग्णांना सेवा दिली. त्यांच्यावर कोणताही डाग नाही. ते शुद्ध व्हीजन असलेले आणि सेवाभावी व्यक्तिमत्त्व आहेत. विकासाचा कोणताही मुद्दा विरोधकांकडे नाही. विरोधकांना फक्त नाव असेल, असा उमेदवार हवा असतो, काम करणारा नाही. आम्ही मात्र सामान्य नागरिकांच्या समस्या ओळखून त्यांचे निराकरण करू. पालिकेवर आजमितीस १४० कोटींची थकबाकी आहे. परंतु माननीय नगरविकासमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मदतीने पालिका कर्जमुक्त करण्याचा आमचा संकल्प आहे.

शहरातील पाणीपट्टी, घरपट्टी, रस्ते, जल नियोजन, नाट्यमंदिर बांधणी, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीसारखी महत्त्वाची कामे आम्ही आधीच केली आहेत. पाणीपट्टी कमी करणे, गोरगरिबांची घरपट्टी माफ करणे अशा स्वरूपाची कामे आमच्याकडून यापुढेही सुरू राहतील. तसेच शहरासाठीच्या पुढील योजनांविषयक विचारही सुरू आहे. आरोग्य, पाणी, रस्ते आणि सांस्कृतिक विकास यांना प्राधान्याने महत्त्व देत आम्ही पुढे जात आहोत. त्यामुळे मतदार नक्कीच आमच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देत पालिकेत सत्तेवर बसवतील, असा आम्हाला विश्वास आहे.

## काँग्रेसची नामुष्की; नगरसेवकपदासाठी फक्त दोनच अर्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका निवडणुकीत उमेदवारांनी काँग्रेस पक्षाकडे पूर्णतः पाठ फिरविली आहे. विशेष म्हणजे नगराध्यक्षपदासाठी काँग्रेसकडून एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. नगरसेवकपदासाठी केवळ दोन उमेदवारांकडून अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे काँग्रेसची घसरण अधोरेखित होत असून, शहरात काँग्रेसचे अस्तित्व संपत चालले की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. यासंदर्भात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले, की शहरातील महत्त्वाच्या बैठकींसाठी आम्हाला कोणाकडूनही बोलाविण्यात आले नाही. काहींनी परस्पर काही निर्णय घेतले. आम्हाला कोणत्याही प्रकारची माहिती दिली गेली नाही. तसेच उमेदवारी निवड प्रक्रियेबाबत आम्हाला विचारणाच झाली नाही. या संपूर्ण गोंधळयुक्त स्थितीमुळे काँग्रेसवर नामुष्कीची वेळ आली आहे. राजकीय वर्तुळात विविध चर्चांना ऊत आला आहे. पक्षातील अंतर्गत मतभेद, सुसंवादांचा अभाव आणि कमकुवत संघटन यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा आहे. दरम्यान, यंदाच्या निवडणुकीतील काँग्रेसची पारंपरिक मते कुठे व किती प्रमाणात जातात यावरही काही उमेदवारांचे बऱ्यापैकी राजकीय भवितव्य अवलंबून आहे.

## नगरसेवकाची जबाबदारी व्यापक; नागरिकांच्या अपेक्षाही वाढल्या...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील नगरपरिषद निवडणुकांचे वातावरण तापू लागले असताना स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व पुन्हा एकदा व्यापकपणे चर्चेत आले आहे. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, गटारी, कचरा व्यवस्थापन, प्रकाशव्यवस्था आणि आरोग्य सुविधा यांसारख्या दैनंदिन प्रश्नांचा थेट संबंध लोकांच्या जीवनमानाशी असल्याने नगरपरिषदेतील लोकप्रतिनिधी म्हणजेच नगरसेवक यांची भूमिका अधिक निर्णायक ठरते. तथापि, या पदाच्या जबाबदाऱ्या किती विस्तृत आणि नागरिकांच्या हक्कांशी निगडित आहेत, याची पूर्ण जाण अनेकांना नसते.




महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ नुसार नगरसेवक हा क्षेत्रातील नागरिकांनी थेट निवडून दिलेला स्थानिक प्रतिनिधी आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणांपासून अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सहभागासाठी त्याच्यावर कायदेशीर जबाबदारी येते. स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशव्यवस्था, रस्ते, सार्वजनिक शौचालये, आरोग्य सुविधा अशा मूलभूत सेवांची गुणवत्ता व सातत्य सुनिश्चित करणे ही त्याची प्राथमिक कर्तव्ये. त्याचबरोबर नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यावर त्वरित उपाययोजना करणे आणि प्रशासनाशी प्रभावी समन्वय ठेवणे ही त्याच्या कामाची दुसरी महत्त्वाची बाजू आहे. नगरपरिषदेचा वार्षिक अर्थसंकल्प, सार्वजनिक निधीचा पारदर्शक वापर, विकासकामांच्या प्राधान्यक्रमांची आखणी, बांधकाम परवानग्यांची प्रक्रिया, झोनिंग धोरणे, करनिर्धारण, मालमत्ता मूल्यांकन, पर्यावरण संरक्षण आणि शहररचना यांसारख्या विषयांवर नगरसेवकांचा थेट प्रभाव असतो. शहरातील विकासकामांची गुणवत्ता, गती आणि दिशादर्शन मुख्यत्वे त्यांच्या निर्णयक्षमतेवर अवलंबून असते. त्यामुळे नगरसेवक फक्त नागरिक प्रशासन यांच्यातील दुवा नसून शहराच्या हिताचा संरक्षक आणि लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वाचा प्रहरी ठरतो.

मतदारांच्या अपेक्षांमध्ये वाढ आजचा मतदार अधिक जागरूक झाल्याने नगरसेवकांकडून अपेक्षाही प्रकर्षाने वाढल्या आहेत. नागरिकांना नगरसेवकात पुढील गुण अपेक्षित असतात. प्रामाणिकता आणि पारदर्शकता, उपलब्धता आणि संवादकुशलता, विकासाभिमुख दृष्टिकोन, नियमांचे पालन आणि भ्रष्टाचारमुक्त कामकाज, सर्वसमावेशकता आणि सामाजिक जाणीव, अधिकारी वर्गावर प्रभावी देखरेख इत्यादी. ही गुणवैशिष्ट्ये असलेला नगरसेवकच शहराच्या दीर्घकालीन विकासाला दिशा देऊ शकतो, अशी नागरिकांची धारणा आहे.

**सजग मतदानाची गरज अधोरेखित**

राजकारणात पैशाचा प्रभाव वाढत असल्याच्या चर्चा सर्वत्र होत असल्या, तरी नागरिकांची अपेक्षा आहे की निवडून येणारे प्रतिनिधी कायद्याने ठरविलेल्या जबाबदाऱ्यांचे प्रामाणिकपणे पालन करतील. जनहिताला केंद्रस्थानी ठेवून काम करतील. शहराचा विकास, शासकीय सेवांची गुणवत्ता आणि लोकशाहीची मजबुती ही मोठ्या प्रमाणावर सजग मतदानाशी निगडित आहे. त्यामुळे योग्य प्रतिनिधीची निवड हेच शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी निर्णायक ठरणार आहे.

**– ॲड. सारांश सोनार**
**(कायदे अभ्यासक, वक्ते)**

## अनधिकृतरित्या वाळू उपसा केल्याप्रकरणी डंपर जप्त; मालकास दोन लाख रुपये दंड

### साठा करून वाहतूक केल्याचे पंचनाम्यात झाले स्पष्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहराजवळील नदी पात्रात अनधिकृतरीत्या वाळू उपसा करून तिची विक्रीसाठी वाहतूक केली. या प्रकरणी अमळनेर महसूल विभागाने मोठी कारवाई केली आहे. त्यानुसार डंपरमधून (एमएच १४-जेएल ७९३४) ४ ब्रास वाळूची वाहतूक करताना आढळून आल्याने संबंधित डंपर जप्त करून मालक आकाश जगन जेटे ऊर्फ डॅनी भय्या (रा. अमळनेर) यांना दोन लाख रुपये शास्ती आकारणीची (दंड) नोटीस बजावण्यात आली आहे. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांच्याकडील संयुक्त अहवालानुसार संबंधित



डंपरमधून अनधिकृतरित्या वाळूसाठा करून वाहतूक केली जात असल्याचे पंचनाम्यात स्पष्ट झाले. त्यामुळे डंपर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला. या प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (८) तसेच १२ जानेवारी २०१८ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रान्वये कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, जप्त केलेल्या ४ ब्रास वाळूसाठी बाजारभावानुसार दंड व कराची रक्कम मिळून एकूण एक लाख सहा हजार सहाशे बारा रुपये आकारण्यात येणार आहेत. त्यासोबत डंपरवरही दोन लाख रुपये शास्ती (दंड) प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये संबंधित वाहनमालकास नोटीस स्वीकारल्यापासून तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. खुलासा न दिल्यास एकतर्फी दंड आकारून पुढील कारवाई केली जाईल, असेही नोटिशीत म्हटले आहे. वाहन सोडविण्यासाठी आर. सी. बुकची प्रत, चालक परवाना, मालक व चालकाची ओळखपत्रे (२ प्रती), तसेच दंडाची पावती तहसील कार्यालयात सादर करावी लागणार आहे.

## माजी विद्यार्थ्यांकडून मुलींसाठी स्वच्छतागृह बांधण्याचा संकल्प

### अमळगावच्या आदर्श विद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात स्नेहमेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळगाव (ता. अमळनेर) येथील आदर्श माध्यमिक विद्यालयात दहावीच्या १९८२ मधील बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच झाला. त्यात सामाजिक जाणिवेचे उचित भान राखत शाळेतील मुलींसाठी स्वच्छतागृह बांधण्याचा संकल्प संबंधितांकडून करण्यात आला. तब्बल ४३ वर्षांनी एकत्रित आलेल्या मित्र-मैत्रिणींचा हा स्नेहमेळा सर्वांसाठी भावूक ठरला. सेवानिवृत्त मुख्याध्यापक एस. एच. देशमुख या स्नेहमेळाव्याच्या



अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाची सुरूवात ढोल-ताशांच्या गजरात गुरुजनांचे फेटे बांधून व पुष्पवृष्टी करून अनोख्या पद्धतीने स्वागत करून झाली. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता नंदू निंबा भोई (१९८२ ची बॅच) यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी सर्व सेवानिवृत्त गुरुजनांचा माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर जुन्या आठवणींना उजाळा देत गुरुजनांसह माजी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. दिवसभर चाललेल्या या स्नेहमेळाव्यात मित्र-मैत्रिणींनी परिचय, थट्टा-मस्करी, वाद्यसंगीतावर नृत्य, स्नेहभोजन यांचा मनसोक्त आनंद घेतला.

कार्यक्रमादरम्यान विद्यालयाचे स्कूल कमिटी चेअरमन भाऊसाहेब दीपक भोसले यांनी नंदू भोई आणि इंजि. संजय देविदास पाटील यांचा मुख्याध्यापक अण्णासाहेब पी. जे. देवरे यांच्या उपस्थितीत यथोचित सत्कार केला. प्रा. संजीव पाटील यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.



# समुद्रात सापडले २००० वर्षांपूर्वीचे जहाज

## अनोखा खजिन्याची चमक आजही कायम



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पुरातत्वशास्त्रज्ञांनी सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी बुडालेले ग्रीक-रोमन काळातील एक जहाज शोधून काढले आहे. या जहाजात पहिल्या शतकातील उच्च प्रतीची सिरॅमिक भांडी मोठ्या प्रमाणात सापडली आहेत, जी त्या काळातील दैनंदिन जीवन आणि व्यापार पद्धतींवर प्रकाश टाकतात. तुर्कीच्या अँटाल्याजवळील अद्रासन किनाऱ्याजवळील समुद्रात हे जहाज सापडले.

### टाइम कॅप्सूल

प्राध्यापक डॉ. हाकान ओनिझ आणि त्यांच्या टीमने १२० ते १५० फूट खोलीवर हे जहाज शोधले. जहाजाच्या कार्गो होल्डमध्ये प्लेट्स, वाट्या आणि ट्रे यांसारख्या सिरॅमिक वस्तू अत्यंत व्यवस्थित रचलेल्या आढळल्या जणू काही त्या एखाद्या गोदामासाठी किंवा बाजारात पाठवण्यासाठी तयार होत्या. या वस्तूंची मांडणी प्राचीन काळातील व्यापाऱ्यांनी आपल्या मालाच्या सुरक्षिततेसाठी आणि पॅकिंगसाठी किती काळजी घेतली हे दर्शवते. तुर्कीच्या संस्कृती आणि पर्यटन मंत्रालयाने या जहाजाला केवळ मालवाहू जहाज न म्हणता, त्या काळातील व्यापार, कलाकुसर आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे ' टाइम कॅप्सूल ' म्हटले आहे.

### उच्च प्रतीची भांडी

जहाजात सापडलेल्या भांड्यांची बनावट आणि लालसर चमक ' ईस्टर्न सिगिलाटा ए ' या श्रेणीतील असल्याचे दर्शवते. ही त्या काळातील उच्च प्रतीची लाल सिरॅमिक भांडी होती, ज्यांची निर्यात संपूर्ण पूर्व भूमध्यसमुद्राजवळील परिसरात केली जात असे. ही भांडी केवळ घरगुती वापरासाठी नव्हती, तर ती एका विशिष्ट पद्धतीने तयार केली जात असत. व्यापारी मोठ्या प्रमाणावर एकसारख्या आकाराची आणि डिझाइनची भांडी विकत असत.

### उघडली प्राचीन व्यापाराची डायरी

डॉ. ओनिझ यांच्या मते, ' जेव्हा एखाद्या जहाजात एकाच प्रकारचा माल मिळतो, तेव्हा ते प्राचीन व्यापाराची डायरी उघडल्यासारखे आहे.' तज्ज्ञांच्या मते, ही भांडी एंटिओक आणि त्याच्या आसपासच्या कारखान्यांमध्ये तयार झाली होती. यावरून असे दिसून येते की, त्या काळात अँटाल्या आणि दक्षिण अनाटोलियाची बंदरे पूर्व भूमध्यसमुद्राच्या व्यापारी नेटवर्कशी खोलवर जोडलेली होती. हजारो वर्षे समुद्रात राहूनही या भांड्यांचा रंग, नक्षीकाम आणि पृष्ठभागाची चमक बऱ्याच अंशी सुरक्षित असल्याचे दिसून आले आहे.
हे खरोखर आश्चर्यकारक आहे.

# बी.टेक. के बाद छोड़ी जॉब, २ साल कमरे में बंद...

## ऑनलाइन की पढ़ाई, यूपीएससी फतह कर रेखा ऐसी बनीं आयएएस

सक्सेस स्टोरी



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जिंदगी में सफलता उन्हीं को मिलती है जो अपने दिल की सुनते हैं। मुश्किलें कितनी भी आएंलेकिन पूरी लगन के साथ अपने लक्ष्य की ओर बढ़ने वाले सफलता हासिल कर ही लेते हैं। आयएएस रेखा सियाक की कहानी भी यही सिखाती है कि चाहें रास्ता कितना ही कठिन क्यों न हो, अगर इरादा मजबूत हो तो मंजिल मिल जाती है। बगैर कोचिंग ही उन्होंने सफलता पाई। आइए जानें रेखा ने खुद को कमरे में बंद कर ऑनलाइन पढ़ाई से कैसे आयएएस तक का सफर तय किया।

साधारण परिवार से निकलकर असाधारण लक्ष्यएक इंटरव्यू में रेखा सियाक बताती हैं कि वह राजस्थान के सीकर जिले के लक्ष्मणगढ़ घनाड़ा की रहने वाली है। वह साधारण परिवार से आती हैं। उनके पिता एलआयसी एजेंट और मां गृहिणी हैं। ३ भाई-बहनों में सबसे छोटी रेखा पढ़ाई में हमेशा आगे रहीं।

### १२ वीं के बाद जेईई क्रैक कर पहुंचीं एमएनआयटी

१२ वीं के एग्जाम के बाद रेखा ने जेईई की तैयारी और एग्जाम क्लियर कर लिया। इसके बाद उन्हें जयपुर के प्रतिष्ठित मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी में बी. टेक किया। यहां से सिविल ब्रांच के बाद जॉब की ओर बढ़ीं।

### जॉब के दौरान बड़ा फैसलाफिर शुरू हुआ सफर

बी. टेक के बाद रेखा ने एक प्राइवेट कंपनी में काम किया लेकिन उनका सपना यूपीएससी थी। उन्हें अहसास हुआ कि जिंदगी वही नहीं है जो वे कर रही हैं बल्कि वह हैजो करना चाहती हैं। उन्होंने एक बड़ा फैसला लिया और यूपीएससी की तैयारी शुरू कर दी।

### महंगी कोचिंग नहीं, ऑनलाइन गाइडेंस और २ साल की मेहनत

रेखा ने यूपीएससी की तैयारी के लिए न तो शहर बदला और न ही महंगी कोचिंग ज्वाइन की। उन्होंने २ साल तक कमरे में रहकर १० से १२ घंटे की पढ़ाई की। ऑनलाइन पढ़ाई कर नोट्स तैयार किए। उन्होंने सोशल मीडिया से दूरी बनाए रखी और पूरी तरह पढ़ाई पर ध्यान केंद्रित किया। मॉक इंटरव्यू देखकर और मेंस की तैयारी के लिए बहुत प्रैक्टिस की।

### यूपीएससी में एआयआर-१७६, परिवार का बड़ा सहयोग

पहले २ प्रयास के बाद रेखा ने सही दिशा में मेहनत की। अनुशासन के साथ तैयारी करते हुए तीसरे प्रयास में सफलता हासिल की। यूपीएससी सिविल सेवा परीक्षा २०२४ में ऑल इंडिया रैंक १७६ के साथ वह आयएएस बनीं। वह अपनी तैयारी में परिवार का सहयोग मानती है। उनकी कहानी उन सभी लोगों को मोटिवेट करती है जो संघर्षों के साथ आगे बढ़ रहे हैं।

# '४' या संख्येची आर-पारची गंमत-जंमत!

■ औषधोप ४ ■ मानसोप ४
■ प्रथमोप ४
■ समोप ४ ■ पाहुण ४
■ सदवि ४ ■ दूरवि ४
■ सं ४ ■ वि ४ ■ आ ४
■ प्र ४ ■ ला ४ ■ सदा ४
■ समा ४ ■ शिष्टा ४ ■ भ्रष्टा ४ ■ अत्या ४ ■ सुवि ४ ■ उप ४
■ अवि ४ ■ कुवि ४ ■ हिंसा ४

### ' चार 'ची गाथा

थोडी कडू, थोडी गोड पण जिला नाही तोड. अशी ही चौपदरी कथा आहे!

चारची खरी बाजू ' चार ' दिशेत आहे!

' चार ' खांबांशिवाय घर बांधता येत नाही.

' चार ' गोष्टी शिकल्याशिवाय शहाणपणा येत नाही.

' चार ' चौघांत जे बोलू नये ते बोलले की गालावर ' चार ' बोटे उमटल्याशिवाय राहत नाहीत.

' चार ' शब्द सणसणीत सुनावणे म्हणजे कानाखाली ' चार ' आवाज काढण्या सारखेच असते.

चौघे म्हणजे जणू ' चार ' वेद आणि यांनी एकमेकास गुणिले की दुप्पट उपनिषदे होतात.

' चार 'चा ' वर्ग ' केला की माणूस तरुण होतो अन् सोळाव्या वर्षात पाऊल ठेवतो.

' चार 'च्या ' वर्गा 'स पुन्हा ' चार 'ने गुणले की जगातल्या सर्वांत ' बुद्धि 'मान खेळातले चौसष्ट घरांचे ' बळ ' मिळते.

यांची टीका ही ' चौफेर ' असते. यांचे फटके म्हणजे ' चौकार ' असतात !

चारचे सामर्थ्य देवीच्या ' चार ' भुजांसारखे असते अन पावित्र्य गाईच्या ' चार ' पावलांसारखे असते.

ज्या विहिरींचे पाणी शेतकरी पिकाला पाजतो ती सुद्धा कमीत कमी ' चार ' परस खोल असावीच लागते.

' चार ' वाफे असल्याशिवाय मातीत बांध घालता येत नाहीत.

' चार ' पाकळ्या असल्याशिवाय फुलाला शोभा येत नाही.

जगातल्या ' चौघां 'चेही असेच असते. यांनी ' चार ' शिव्या दिल्या शिवाय जगाला शहाणपण सुचत नाही.

अन् ' चार ' गोष्टी हिताच्या सांगितल्याशिवाय सुख दुःखे उमजत नाहीत.

ज्या घरात आपण राहतो तेदेखील ' चौसोपी ' असल्याशिवाय त्याला रुबाब येत नाही.

चौसोपी घराबाहेर ' चारचाकी ' असली की शान अधिक वाढते.

' चार 'चौघांना विचारल्याशिवाय खरे सत्य समजत नसते.

' चार ' लोकांपासून ' चार ' हात लांब राहिले तर खरे मित्रही कळत नाहीत.

युगे देखील ' चार ' झाली आहेत. कृत, त्रेता, द्वापार आणि कलीयुग; यावरून ' चौघां 'चा महिमा जाणावा.

स्वर जरी सात असले तरी सामान्यतः बोलताना ' सारेगम ' कळले म्हणजे संगीत आले असे म्हटले जाते.

आपल्या जीवनाचे आधार देखील ' चार 'च आहेत - दोन हात अन दोन पाय.

लीप वर्ष देखील ' चार ' वर्षांनी येते.

जमीन सुद्धा ' चौरस 'च शुभ समजली जाते.

माणूस हुशार झाला की त्याला ' चौकस ' बुद्धीचा समजले जाते.

चारोळीत देखील महाकाव्याचा अर्थ लिहिता येतो, चारोळी खाल्ली की प्रकृती सुधारते.

' चार ' ढांगा चालले की मातीचा अंदाज येतो.

' चार ' कडवी वाचली की कवितेची गोडी लागते.

' चार ' संवाद ऐकले की नाटके पाहावीशी वाटतात.

' चार ' घास खाल्ले की पोट भरल्यासारखे वाटते.

' चार ' घटका लवंडले की आराम मिळाल्यासारखे वाटते.

' चार ' वाती प्रज्वलित केल्या की मनातला अन् घरातला अंधार दूर होतो.

' चार ' पुस्तके वाचल्याशिवाय ज्ञानाची ओढ लागत नाही.

मंगलकार्य साजरे करताना सनई बरोबर ' चौ 'घडे वाजल्याशिवाय रंगत कसली ती येत नाही.

' चार ' वाईट जर एकत्र आले तर मात्र ती चांडाळ ' चौकडी ' होते.

' चार ' चांगले लोक एकत्र आले तर मात्र इतिहास बदलतो.

इतकेच कशाला चितेवर ' चार ' लाकडे ठेवल्याशिवाय चिता पूर्ण होत नाही.

' चौघां 'च्या खांद्यावर गेल्याशिवाय जीवनातला प्रवास पूर्ण होत नाही.

सरते शेवटी असे म्हणेन की जीवनात जीवाला जीव लावणारे ' चार ' मित्र असल्याशिवाय जीवनाचा अर्थ उमगणार नाही, उमजणार नाही.

# माझा १२ वर्षांचा मुलगा आहे... तो बघेल तर?

## नॅशनल क्रश झाल्यानंतर गिरीजा ओकची पहिली प्रतिक्रिया; अश्लील फोटोंवर नाराजी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री गिरीजा ओक सध्या सोशल मीडियावर ' नॅशनल क्रश ' म्हणून व्हायरल झाली आहे. तिच्या एका जुन्या फोटोने इंटरनेटवर धुमाकूळ घातला असताना, गिरीजा ओकने याबाबत आपली पहिली अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. आनंद, कौतुक आणि प्रेम यासोबतच तिने काही अश्लील आणि एआयद्वारे तयार केलेल्या विकृत फोटोंबद्दल गंभीर नाराजी व्यक्त केली आहे.



### भांबावून सोडणारे

" गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर जे सुरू आहे ते भांबावून सोडणारे आहे. पण मला आनंद देखील खूप होत आहे," असे गिरीजा म्हणाली. तिच्या म्हणण्यानुसार तिला हजारो सुंदर मेसेज, छान कॉमेंट्स आणि प्रेमळ शुभेच्छा मिळत आहेत. मित्र, नातेवाईक आणि चाहत्यांनी तिच्या नावाने तयार केलेले मिम्स, फोटो आणि व्हिडिओ पाठविले आहेत. यातील काही अत्यंत सर्जनशील आणि विनोदी असल्याचे तिने सांगितले.

### एआय वापरून फोटो विकृत

मात्र, या आनंदाच्या लाटेत काही काही फोटो अश्लीलही आहेत. एआयचा वापर करून ते बनविण्यात आले आहेत, अशी खंत गिरीजा ओकने व्यक्त केली. तिच्या मते, ट्रेंडिंग विषयांभोवती असे विकृत फोटो तयार करणे ही सोशल मीडियावरील सामान्य प्रथा आहे. " बायकांचे केले जातात, पुरुषांचे देखील केले जातात. एआय वापरून फोटो विकृत केले जातात, बदलले जातात, पोस्ट केले जातात. क्लिक मिळावेत, लाईक्स वाढावेत, व्ह्यूज वाढावेत, हे सगळ्यांना माहिती आहे," असे ती म्हणाली.

### नियम नसलेला खेळ

या प्रथेला तिने ' नियम नसलेला खेळ ' म्हटले. " या खेळात काहीच नियम नाहीत. या गोष्टीची भीती वाटते," असे तिने स्पष्ट केले. विशेष म्हणजे गिरीजा ओकने आपल्या वैयक्तिक आयुष्याशी जोडून ही चिंता मांडली. " मला १२ वर्षांचा मुलगा आहे. आता तो सोशल मीडियाचा वापर करत नाही. पण मोठा होऊन तो वापर करेल. आणि हे जे मॉर्फ केलेले फोटो सैदेव राहतील, त्याने माझा असा जर फोटो पाहिला तर त्याला काय वाटेल? याचा विचार करून मला छान नाही वाटत," असे ती भावूकपणे म्हणाली.

फोटो पाहताना येणारी ' चीप मजा ' ही चिंतेची बाब

तिने पुढे स्पष्ट केले, की तिच्या मुलाला हे माहित असेल की फोटो खरा नाही, तो एआयने बनवलेला आहे. पण तरीही असे फोटो पाहताना येणारी ' चीप मजा ' ही चिंतेची बाब आहे. " या सगळ्या गोष्टींचा विचार करून मला हे सांगावेसे वाटले. काहीच न करणे मला उचित वाटत नव्हते," असे सांगत तिने सोशल मीडिया वापरकर्त्यांना आवाहन केले.

" तुम्ही जर हा व्हिडिओ बघत असाल, तर थोडा विचार करा. लाईक करणाऱ्यांनी देखील विचार करावा," अशी विनंती तिने केली. यासोबतच तिने सांगितले, की या सगळ्या गोंधळातही तिला खूप मजा येत आहे. " खूप लोक कॉल करत आहेत, मला खूप प्रेम मिळत आहे," असे ती हसत म्हणाली.

गिरीजा ओकच्या या प्रतिक्रियेमुळे सोशल मीडियावरील जबाबदारी, एआयच्या दुरुपयोगाबाबत आणि महिलांच्या प्रतिमेच्या होणाऱ्या विकृतीकरणाबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# 'नॅशनल क्रश' झाल्यानंतर गिरीजा ओकचे वाढले फॉलोवर्स





*छोट्या आणि मोठ्या पडद्यावर, अनेक नाटकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली लोकप्रिय अभिनेत्री गिरीजा ओक गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाली आहे. तिच्या एका व्हिडिओने ती थेट ' नॅशनल क्रश ' बनली आहे. गिरीजाने यासंदर्भात मुलाखतही दिली होती. त्यानंतर तिचे फोटो आणि व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाले. यात तिने निळ्या रंगाची साडी आणि स्लिव्हलेस ब्लाऊज परिधान केले होते. त्यानंतर ती रातोरात स्टार झाली. आता चाहते तिच्या पोस्टची आतुरतेने वाट पाहताना दिसतात. मात्र या सगळ्यानंतर गिरीजाच्या फॉलोवर्समध्ये किती वाढ झाली आहे माहिती आहे का? गिरीजाचे दिसणे यासोबतच तिच्या बोलण्याची पद्धत, तिच्या अदा या सगळ्यांवर नेटकरी फिदा झाले आणि ती ' नॅशनल क्रश ' बनली. संपूर्ण देशाचे लक्ष तिच्याकडे लागले. यावर तिने प्रतिक्रियाही दिली होती. त्यात ती म्हणाली, की हे ट्रेंड आहेत. हे येतात आणि जातात. मात्र माझे काम कायम राहणार आहे. यावर मराठी चाहतेदेखील तिला आधीपासूनच ओळखत असल्याचे म्हणत अभिमानाने ती मराठी असल्याचे सांगत होती.*

*' नॅशनल क्रश ' बनल्यापासून तिच्या फॉलोवर्समध्ये हजारोंनी नव्हे, तर लाखोंनी वाढ झाली आहे. हे आकडे बरेच मोठे आहेत.*

*गेल्या काही दिवसांत गिरीजाच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर तब्बल दोन लाख तेरा हजार ९९० फॉलोवर्स वाढले आहेत. तर एक्सवर तिचे तब्बल सात लाख ५२ हजार इतके फॉलोवर्स वाढले आहेत. गिरीजाचा जन्म २७ डिसेंबर १९८७ रोजी नागपूरमध्ये झाला. तिचे वडील ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक आणि आई पद्मश्री फाटक आहेत. तिने बायोटेक्नोलॉजीमध्ये पदवी घेतली आहे. तिचे पती दिग्दर्शक सुहृद गोडबोले आहेत. तिने थिएटर वर्कशॉप केले, सोबतच तिने बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदवी घेतली आहे. तिने मराठी, हिंदीसोबतच कन्नड सिनेमातही काम केल आहे. तिने मराठीमध्ये ' गुलमोहर ', ' लज्जा ', ' नवरा माझा भवरा ' या चित्रपटांत काम केले आहे.*

# गिरीजा ओक कशी बनली 'नॅशनल क्रश'?

मराठी मनोरंजनसृष्टीतील अभिनेत्री गिरीजा ओक सध्या इंटरनेट सेन्सेशन बनली आहे. ' तारे जमीन पर ' आणि शाहरुख खानच्या ' जवान 'सारख्या चित्रपटांमध्ये काम केलेली ही ३७ वर्षीय अभिनेत्री सध्या तिच्या निळ्या साडीतील फोटोंमुळे प्रचंड व्हायरल होत आहे.

तिची तुलना थेट हॉलिवूड अभिनेत्री मोनिका बेलूची आणि सिडनी स्वीनी यांच्याशी केली जात आहे. पण मराठमोळी सुंदरी गिरीजा ओक ' नॅशनल क्रश ' कशी बनली? यामागील ५ सिक्रेट्स एका प्रसिद्ध लेखकाने उघड केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते सन्मानित या लेखकाने व्हिडिओ शेअर करत गिरीजा ओकच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण केले आहे. त्यांनी तिच्याबद्दल पाच खुलासे केले आहेत, ज्यावरून ती नॅशनल क्रश होण्यास किती योग्य आहे, हे दिसून येते. आजकाल अंग प्रदर्शन करण्याची स्पर्धा असताना गिरीजा ओक स्लीव्हलेस ब्लाऊजसह साध्या पण तितक्याच ग्रेसफूल साडीत दिसते. हा लूक खूप युनिक आहे. साडीसुद्धा इतकी स्मार्ट पद्धतीने नेसता येते, हे तिने दाखवून दिले. गिरीजाच्या लूकमध्ये घरगुती साधेपणा आणि स्मार्टनेस यांचा एक परफेक्ट कॉम्बो आहे, जो पुरुषवर्गाला खूप आकर्षित करतो. तिला पाहून वाटते की ही स्त्री घर, कुटुंब आणि त्याचबरोबर तिचे करिअर असे सगळे काही सांभाळून घेईल.

त्यांच्या मते, गिरीजा ओकचे हास्य खूप शालीन आणि मंत्रमुग्ध करणारे आहे. तिचे एक्स्प्रेशन्स खूप चांगले आहेत. तिच्या डोळ्यात एक खोली आहे. यामुळेच तिचे निरागस सौंदर्य चाहत्यांना भुरळ घालते. गिरीजाच्या लूकमध्ये एकीकडे अवखळ मुलीसारखा निरागसपणा दिसतो, तर दुसरीकडे तिच्या वर्तनात परिपक्कता दिसते. ज्यामुळे पुरुषांना अशा मुलींबद्दल आत्मविश्वास मिळतो. गिरीजाच्या व्यक्तिमत्त्वात कोणताही गोंधळ दिसत नाही. तिचे व्हीजन स्पष्ट आहे. तिची भाषा आणि उच्चार उत्कृष्ट आहेत. त्यामुळे ती लगेचच सर्वांचे लक्ष वेधून घेते. गिरीजा ओक अशा नारीच्या रूपात समोर आली आहे, जिला पाहून वाटते, की पुरुष सोबत नसला तरी ती पूर्ण घर व्यवस्थित सांभाळून घेईल. ती हुशार, सुशिक्षित आणि संवेदनशील दिसते. ज्यामुळे ती आजच्या काळातील ' आदर्श नारी 'च्या प्रतिमेत एकदम फिट बसते. अशा स्त्रिया पुरुषांच्या फॅन्टसीमध्ये असतात.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# सरकारने पत्रकारितेचा विषय गांभीर्याने घ्यावा, अन्यथा रस्त्यावर उतरू : संदीप काळे

## ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या पंढरपूरमधील अधिवेशनातील १५ ठराव तातडीने मंजूर करण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : ‘ व्हॉईस ऑफ मीडिया ’, ‘ व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम ’चे महाराष्ट्र राज्य शिखर अधिवेशन पंढरपूर येथे अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात नुकतेच पार पडले. राज्यभरातून तब्बल दोन हजारांहून अधिक पत्रकारांनी उपस्थित राहून या दोन दिवसीय अधिवेशनाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. पत्रकारांच्या हक्कांसाठी, सुरक्षिततेसाठी आणि सुदृढ पत्रकारितेसाठी एकूण १५ ठराव अधिवेशनात एकमताने संमत करण्यात आले. हे सर्व ठराव राज्य सरकारने तातडीने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी, अन्यथा राज्यातील पत्रकार रस्त्यावर उतरतील, असा तीव्र इशारा ‘ व्हॉईस ऑफ मीडिया ’चे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी दिला.

अधिवेशनात पत्रकारांचे किमान वेतन शासनाने निश्चित करून त्याची सक्तीने अंमलबजावणी करावी, पत्रकार सुरक्षा कायदा अधिक कडक करावा आणि जिल्हा–तालुका पातळीवर पत्रकार संरक्षण अधिकारी नेमावेत, अशा मागण्यांना प्राधान्य देण्यात आले. सर्व पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी १० लाखांचा आरोग्य विमा आणि २५ लाखांचा अपघात विमा अनिवार्य करावा, पत्रकार निवृत्तीवेतन योजना लागू करावी आणि सरकारी गृहनिर्माण योजनांमध्ये पत्रकारांसाठी २ टक्के राखीव कोटा देण्यात यावा, असे ठरावही संमत करण्यात आले. जिल्ह्यातील प्रेस क्लब यांचे आधुनिकीकरण, माहिती खात्यात ‘ मीडिया सपोर्ट सेल ’ स्थापन करणे, राज्यस्तरीय पत्रकार प्रशिक्षण अकादमी उभारणे, पत्रकार अधिवेशनांना सरकारी आर्थिक सहाय्य, न्यूज पोर्टल नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे आणि पत्रकारांवरील खोटे खटले मागे घेण्यासाठी विशेष समिती स्थापणे, या ठरावांनाही व्यापक पाठिंबा मिळाला.

आपत्तीग्रस्त पत्रकारांसाठी तत्काळ मदत निधी, महिला पत्रकारांसाठी सुरक्षित निवास, प्रवास भत्ता, मातृत्व रजा, क्रेच सुविधा आणि लैंगिक छळ प्रतिबंधासाठी कडक यंत्रणा लागू करावी, असा ठरावही अधिवेशनात मंजूर करण्यात आला. तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विशेष पत्रकार सन्मान व गौरव योजना सुरू करण्याचाही ठराव एकमुखी पारित झाला.

अधिवेशनात पारित केलेले सर्व १५ ठराव राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य मंत्रिमंडळाला प्रत्यक्ष भेटून सादर करण्यात येणार असल्याचे यावेळी संघटनेतर्फे जाहीर करण्यात आले. तसेच सर्व पालकमंत्र्यांनाही स्थानिक पातळीवर भेटून या मागण्यांचे स्मरण करून देण्यात येईल. तसेच त्यांच्याकडेही याबाबत पाठपुरावा करण्याचे यावेळी ठरले. सरकारने मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ‘ व्हॉईस ऑफ मीडिया ’चे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले तसेच सर्व राज्य पदाधिकारी, सर्व राज्य कोअर टीम यांनी दिला.

# तब्बल १३ तासांची परीक्षा; जेवणासाठीही नसतो ब्रेक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

युपीएससी ही भारतातील सर्वात अवघड परीक्षा मानली जाते. मात्र, जगात अशी एक परीक्षा आहे, जी अवघड आणि खूप वेळ चालते. भारतातील परीक्षा ही जास्तीत जास्त ३ तासांची असते. मात्र, एक परीक्षा अशी आहे जी १३ तास चालते. याबाबत माहिती जाणून घेऊयात.

आपण जगातील सर्वात लांब परीक्षेची माहिती जाणून घेणार आहोत. ही परीक्षा सलग १३ तास चालते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण किंवा रात्रीच्या जेवणासाठी ब्रेक नसतो. या परीक्षेला सर्वात कठीण परीक्षा म्हटले जाते. दक्षिण कोरियामधील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासाठी एन्ट्रन्स एक्झाम द्यावी लागते. ही परीक्षा १३ तासांची असते. या परीक्षेला कॉलेज स्कॉलॅस्टिक ॲबिलिटी टेस्ट किंवा सुनेउंग असेही म्हणतात. सुनेउंग ही परीक्षा वर्षातून एकदाच नोव्हेंबरमध्ये घेतली जाते. या परीक्षेच्या दिवशी संपूर्ण देशात खबरदारी घेतली जाते. वाहतूक पोलीस रस्त्यावर मदतीसाठी तयार असतात. या परीक्षेत एकूण २०० प्रश्न विचारले जातात. यासाठी विद्यार्थ्यांना ८ तास दिले जातात. ही परीक्षा सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी वाजता सुरू होते. सायंकाळी ५ वाजून ४० मिनिटांना संपते. अपंग व्यक्तींना या परीक्षेसाठी १२ तासांचा वेळ दिला जातो.

# दहावीच्या विद्यार्थ्याला लिहायला सांगितला ‘चोर’ या विषयावर निबंध; मात्र, त्याने लिहिले औरच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दहावीच्या परिक्षेत चोर या विषयावर निबंध लिहा, असे प्रश्नपत्रिकेत नमूद करण्यात आले होते. परिक्षार्थींमधील एका हुशार (?) विद्यार्थ्याने मात्र ‘चोर’ या विषयावर लिहिलेल्या निबंधाने सारेच अवाक झाले. जाणून घेऊयात त्याने नेमके काय लिहिले.

**‘चोर’**

चोर हे देखील देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते रोजगारनिर्मिती आणि देशाच्या विकासात आपले मोठे योगदान देतात. सेफ कुलुपे, लॉकर, कपाटे आदी वस्तू फक्त चोरांमुळेच तयार केल्या जातात. या वस्तू बनविणाऱ्या अनेक कारखान्यांना आणि कामगारांना चोरांमुळे रोजगार मिळतो. घरांमध्ये कुलपे, ग्रील्स, दरवाजे आणि खिडक्यांवर लॅच बसवण्यासाठी मिस्त्री आणि कामगारांना काम मिळते. घरे, दुकाने, शाळा, कॉलेज, ऑफिस आणि कारखाने चोरांपासून वाचवण्यासाठी सुरक्षा रक्षक आणि वॉचमन आवश्यक असतात.

सीसीटीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, सुरक्षा यंत्रणा बनवणाऱ्या कंपन्यांना देखील रोजगार मिळतो. चोरांमुळे पोलीस अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, न्यायाधीश, वकील यांनाही काम मिळते. पोलीस दलासाठी लागणारी बॅरिकेड्स, शस्त्रे, गोळ्या, दंडुके, गणवेश, वाहने आदी खरेदीमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळते. चोरांमुळे तुरुंग, जेलर आणि तुरुंगातील कर्मचारी यांनाही रोजगार मिळतो. मोबाईल, लॅपटॉप, कार, मोटरसायकल, घरगुती वस्तू, पर्स किंवा लिपस्टिक चोरी गेल्यानंतर लोकांना त्या पुन्हा खरेदी कराव्या लागतात. त्यामुळे व्यापार वाढतो. असे म्हणतात, की प्रसिद्ध तसेच नामांकित चोर राजकारणात प्रवेश करून आणखी मोठ्या चोरीला हात घालतात. अशा तऱ्हेने देशाच्या अर्थव्यवस्थेत चोरांचे योगदानही कमी नाही!



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# सपाटपावली म्हणून हिणवलेल्या सुनेला सन्मानाने स्वीकारले

## समुपदेशन करणाऱ्या महिला अन्याय विरोधी समितीचे कौतुक!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अंगाची हळद निघत नाही तेवढ्यात अपशकुनी म्हणून त्रास देत माहेरी पाठविले. तसेच जळगावकर अजय व अमळनेर येथील सुनीताचे लग्न तोडायचा प्रयत्न अमळनेर महिला अन्याय विरोधी समितीने हाणून पाडला.

नुकताच प्रेमविवाह झालेल्या सुनीताला दोनच दिवसात ‘तू सपाट पावली आहे, अपशकुनी आहे, तुला सौभाग्य कमी आहे, माझे मुलाला खाऊन टाकशील’ म्हणून नणंद व आई वडिलांच्या घर डोक्यावर घेवुन माहेरी पोचवून दिले होते त्या मुळे एकच धर्म व समाजाचे असूनही सुनीता व अजयच्या संसारात मोठे विघ्न आले होते. अजयच्या मामी, काक्या व नातलगांनी देखील सुनीताला अपशकुनी निघेल असेच मानले होते. त्यामुळे सुनीताच्या वडिलांनी स्वतः पती अजय याने सामाजिक कार्यकर्ते धनंजय सोनार यांचेशी संपर्क साधून ही व्यथा मांडली. महिला अन्याय विरोधी समिती सदस्यांनी अजयच्या नणंद, नातलग व आईवडिलांना सांगितले की, ‘सुनीताने पोलिसात तक्रार दिली तर तुम्ही सर्व जेलमध्ये जाल व तुमच्या म्हणण्यानुसार ती खरेच अपशकुनी असल्याचा प्रत्यय येऊ शकतो’ अशी गोड धमकी देतानाच सपाट पाय हे अशुभतेचे लक्षण नसते, उलट सपाट पाय असलेल्या अनेकांचे संसार सुखी व बरकत असलेले आहेत, सपाट पाय हे उत्तम ॲथलीटसाठी चांगले मानले जातात, सपाट पायाची व्यक्ती जमिनीशी नाते सांगणारी तसेच अत्यंत विश्वासू व प्रेमळ असते, जोडीदाराशी प्रामाणिक असते, असे अनेक शास्त्रीय व धार्मिक दाखले देऊन अजयच्या नणंद, आई–वडिलांचे समुपदेशनही करण्यात आले.

अनेकांना हे पटले. त्यामुळे स्वतः नणंद, आई, वडील व पंच म्हणून दोन नातलग अमळनेर येथे घ्यायला आले, सुनीताबद्दल झालेली समजूत टाकून तिचा सून म्हणून स्वीकार करीत आहोत, घरी औक्षण करून परंपरेनुसार तिचे पुन्हा स्वागत करू, असे पंचांसमक्ष कबूल केल्याने अजय व सुनिताचा संसार मार्गी लागला. या कामी महिला अन्याय विरोधी समितीचे धनंजय सोनार यांना सौ. मंगला विसपुते, सौ. संगीता बिरारी, निवृत्त फौजदार बाळकृष्ण शिंदे, राजकुमार कोराणी, सौ. निशा विसपुते, अनिल चौधरी, विनोद राऊळ यांनी सहकार्य केले. पंच केशवराव साळुंके, रजनीताई पाटील, भागवत सोनवणे, केशरबाई सोनवणे, कैलास पाटील व दोन्ही परिवारातील नातलग या वेळी उपस्थित होते. समितीच्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले जात आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

मनस्वी आभार...!

आमच्या वाढदिवसानिमित्त आमचे असंख्य मित्र नातेवाईक, समाजबांधव व हितचिंतकांनी आम्हाला शुभेच्छा देवून त्यांचे आमच्यावरील भरभरून असलेले प्रेम प्रतित केले. अनेक मित्रांनी व समाजबांधवांनी समक्ष भेटून आम्हाला शुभेच्छा दिल्या. आमच्यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना केली. त्याबद्दल आम्ही आपल्या सर्वांच्या ऋणात राहू इच्छितो.



भविष्यातही हेच प्रेम, आपलेपण व सहकार्य आम्हाला आपल्याकडून लाभावे,
ही नम्र विनंती!



डॉ. सुमित सुर्यवंशी
Orthopedic Surgeon
Shree Accident Hospital,Amalner

डॉ. रुचीता सुर्यवंशी
PhD, Lecturer,
Shree N.T. Mundada Jr. College , Amalner




# तीर्थ ग्रहण



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तीर्थ स्वतः न घेता नेहमी ज्येष्ठांकडून अथवा पुरोहितांकडून घ्यावे. तीर्थ घेताना हात स्वच्छ असावेत. उजव्या हाताची गोकर्ण मुद्रा करून तीर्थ घ्यावे. उजव्या हाताची तर्जनी अंगठ्याच्या मुळापर्यंत वाकवून गाईच्या कर्णाप्रमाणे मुद्रा करावी आणि त्या खोलगट भागात तीर्थ घ्यावे. तीर्थ प्राशन करताना आवाज करू नये. शक्यतोवर तीर्थ एक थेंबच घ्यावे, कारण तीर्थ लाळेत मिसळावे, त्याचे पोटात जाऊन मैलात रूपांतर होऊ नये, असा संकेत आहे. सामान्यतः घरी पूजा झाल्यावर दोन वेळा तीर्थ घ्यावे. जर त्या दिवशी उपवास असेल तर तीन वेळा तीर्थ घ्यावे. एकादशीचा उपवास दुसऱ्या दिवशी सूर्योदयासमयी तीर्थ प्राशन करून सोडावा. सत्यनारायण असेल तर पूजा झाल्यावर मात्र महापूजा अथवा श्राद्ध असेल तर जेवणापूर्वी तीर्थ घ्यावे. त्यामुळे देव व पितरांचा गौरव होतो. पंचामृत प्राशन केल्यावर डोक्यावरून हात फिरवू नये.

तीर्थ प्राशन करतेवेळी

**'अकाल मृत्यु हरणं सर्वव्याधि विनाशम्। अमुक तीर्थ जठरे धारयाम्यहम्॥`**

वरील मंत्र म्हणून तीर्थ घ्यावे.

मंत्र म्हणून तीर्थ घ्यावे. अमुक या शब्दाजागी विष्णू पादोदकं, शिव पादोदकं, गणेश पादोदकं, सूर्य पादोदकं किंवा देवी पादोदकं चे उच्चारण करावे.

कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी जाताना किंवा परगावी जाताना तीर्थ प्राशन करावे. अशा वेळेस देवघरातील तांब्याच्या पंचपात्रातीलच तीर्थ समजून घ्यावे.

# अर्कविवाह



अर्क म्हणजे रुईच्या झाडाबरोबर लग्न. हा विवाह रुई नावाच्या पवित्र मानलेल्या झाडाशी लावतात. या झाडांत सूर्यदेवता निवास करते, अशी समजूत आहे. ज्या पुरुषाच्या पहिल्या दोन बायका वारल्या असतील त्याने तिसऱ्या पत्नीशी विवाह करण्यापूर्वी भविष्यात पून्हा काही अनिष्ट, अप्रिय घटना घडू नये यासाठी रुईशी अथवा सुर्यकन्येशी विवाह करावा अशी मान्यता आहे. हा रुईबरोबरचा विवाह घरात लावतात किंवा रुईच्या झाडाशेजारी जाऊन लावतात. तो शनिवारी किंवा रविवारी हस्त नक्षत्र असेल अशा मुहूर्तावर लावतात. तिसरा विवाह करण्यापूर्वी काही दिवस आधी हा विवाह लावण्यात येतो. रुईचे झाड पाने, फुले व फळे यांनी युक्त असावे. सामान्य विवाहाप्रमाणे या रुईबरोबरच्या विवाहांतही पुण्याहवाचन, नांदी श्राद्ध, मधुपर्क, नंतर कन्यादान वगैरे सर्व विधी करतात.

# अमावास्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमावास्येच्या दिवशी आकाशात चंद्र दिसत नाही. चंद्र हा मनाचा स्वामी मानला जातो. अमावास्येला काही लोकांचे मन चंचल होत. त्यासोबतच अशा लोकांची शारीरिक हालचालही खूप वाढते.

हिंदू पंचांगात ऋतू आणि तिथींची शास्त्रीय गणना करून सण ठरविले जातात. हिंदू कॅलेंडरनुसार प्रत्येक महिन्यात तीस तारखा असतात. जे १५-१५ दिवसांमध्ये विभागल्या जातात. यापैकी एक पंधरवडा शुक्ल आणि दुसरा पंधरवडा कृष्ण म्हणतात. हिंदू दिनदर्शिकेनुसार या तारखांना प्रतिप्रदा, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, अष्टमी, नवमी, दशमी, एकादशी, द्वादशी, त्रयोदशी असे म्हणतात आणि एका पंधरवड्याच्या शेवटच्या तारखेला अमावास्या आणि शेवटची तिथी म्हणतात. दुसरी बाजू पौर्णिमा आहे. पंचांगमध्ये पाच अंग-वार, योग, तिथी, नक्षत्र आणि करण हे सर्वांत महत्त्वाचे आहेत.

हिंदू धर्मग्रंथांमध्ये, चंद्राच्या १६ कलांना ' अमा ' म्हणतात. चंद्राच्या ' अमा ' कलेमध्ये १६ कलांची शक्ती समाविष्ट आहे. म्हणून अमावास्या असे संबोधले गेले आहे. अमावास्या म्हणजे ज्याला सावलीही नाही आणि उदयही नाही. प्रत्येक महिन्यात एक अमावास्या येते. म्हणजेच १२ महिन्याला बारा अमावास्या पाहावयास मिळतात. अमावास्या पितरांना समर्पित असते.

## किती अमावास्या पाहायला मिळतात?

हिंदू धर्मग्रंथांमध्ये अमावास्येच्या विविध रूपांचे तपशीलवार वर्णन केले आहे. यामध्ये सोमवती अमावास्या, भौमवती अमावास्या, मौनी अमावास्या, शनी अमावास्या, हरियाली अमावास्या, दिवाळी अमावास्या आणि सर्व पितृ अमावास्या या महत्त्वाच्या मानल्या जातात.

# प्रदोष व्रत व उद्यापन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक मासातील शुद्ध आणि वद्य त्रयोदशीला सूर्य मावळण्यापूर्वीच्या तीन घटकांच्या काळाला ' प्रदोष ', असे म्हणतात ' प्रदोषो रजनीमुखम् ।' प्रदोष हे व्रत भगवान शिवाचे आहे.

### प्रदोष व्रत करण्याची पद्धत

या दिवशी दिवसभर उपवास आणि उपासना करून रात्री शिवपूजेनंतर भोजन करावे. प्रदोषाच्या दुसऱ्या दिवशी भगवान श्रीविष्णू यांचे आवर्जून पूजन करावे. या प्रदोष व्रताचा प्रारंभ शक्यतो उत्तरायणात करावा.

### निषेध...

प्रदोषकाळात वेदाध्ययन करू नये, असे सांगितले आहे. कारण हे रात्रकालातील व्रत आहे, तर वेदाध्ययन हे सूर्य असताना करावयाचे असते. हे प्रदोष व्रत तीन ते बारा वर्षे अवधीचे असते. कृष्ण पक्षातील प्रदोष जर शनिवारी आला, तर तो विशेष फलदायी मानतात.

१) सोमप्रदोष...
२) भौमप्रदोष...
३) शनिप्रदोष...
४) पक्षप्रदोष...

### वार...

१) सोमवार...
२) मंगळवार...
३) शनिवार...
४) प्रत्येक पंधरवड्याची त्रयोदशी...

### हेतू...

१) कुलदेवतेचा प्रकोप दूर करणे आणि साधना योग्यरित्या व्हावी...
२) धनलाभ...
३) गुणवान पुत्रप्राप्ती आणि गर्भातील बालकाच्या अडचणी दूर करणे...
४) सोम, भौम शनि प्रदोषातील सर्व...

जीवाला गतजन्मी केलेल्या पापामुळे लागलेल्या विविध प्रकारच्या दोषांचे निवारण करण्यासाठी आणि शिवाला प्रसन्न करण्यासाठी केले जाणारे रात्रकालातील व्रत.

### कालावधी...

३ ते १२ वर्षे किंवा आजन्म...

व्रत आरंभण्याचा उपयुक्त कालावधी...
उत्तरायणाचा आरंभ झाल्यावर प्रदोष व्रत करणे अधिक फलदायी ठरते...

### प्रदोष व्रत...

प्रदोषकाळाचे महत्त्व, तसेच प्रदोषकाळात काय करावे आणि काय करू नये, याविषयीचे विवेचन खालील लेखातून समजून घेऊया.

यामध्ये शिवपूजनाचे महत्त्व आहे. प्रत्येक मासातील शुद्ध आणि वद्य त्रयोदशीला सूर्य मावळण्यापूर्वीच्या तीन घटकांच्या काळाला ' प्रदोष ', असे म्हणतात..... ' प्रदोषो रजनीमुखम् । ' देवता-प्रदोष हे व्रत भगवान शिव यांचे आहे

### प्रदोष व्रत करण्याची पद्धत

पूजनाच्या ठिकाणी स्वच्छता करून रांगोळी काढावी... दिवा लावावा. वातावरण प्रसन्न राहील असे नियोजन असावे. प्रदोष समयी स्नानादी कर्म करून, शुचिर्भूत होऊन, पांढरे स्वच्छ धूत वस्त्र परिधान करून पूवेकडे तोंड करून बसावे. भगवान शंकर यांचे पूजन करण्यासाठी सिद्ध व्हावे. प्रथम विधिवत व शास्त्रशुद्ध गणेशाचे पूजन करावे. त्यानंतर शंकराच्या प्रतिमेचे पूजन करावे, पंचामृत स्नान घालावे. प्रतिमा स्वच्छ पुसून आसनावर ठेवावी. प्रतिमेस चंदन लावावे, हळद, कुंकू वहावे. बेलपत्र वहावे. व्रतासंबंधी कथा असल्यास वाचावी. नैवेद्य दाखवून आरती म्हणावी.

### निषेध

प्रदोष काळात वेदाध्ययन करू नये, असे सांगितले आहे. कारण हे रात्रकालातील व्रत आहे, तर वेदाध्ययन हे सूर्य असताना करावयाचे असते. हे प्रदोष व्रत तीन ते बारा वर्षे अवधीचे असते. कृष्ण पक्षातील प्रदोष जर शनिवारी आला, तर तो विशेष फलदायी मानतात.

### प्रदोष व्रताचे महत्त्व

हे व्रत स्त्री किंवा पुरुष किंवा हे दोघेही करू शकतात. यामुळे असंख्य दोषांपासून मुक्ती मिळते, संकटांचे निवारण होते. या व्रताचे खालीलप्रमाणे साप्ताहिक महत्त्व देखील आहे.

### सोम प्रदोष

हे व्रत सोमवारी प्रदोष असल्यास कुलदेवतेचा प्रकोप दूर होण्यासाठी आणि साधनेत उन्नत्ती होण्यासाठी केले जाते. तसेच इच्छित चांगली मनोकामना पूर्ण होण्यासाठी, सकारात्मकता वाढण्यासाठी केले जाते.

### भौम प्रदोष

हे व्रत मंगळवारी प्रदोष असल्यास धनलाभासाठी केले जाते.

### सौम्यवारा प्रदोष

हे व्रत बुधवारी प्रदोष असल्यास शिक्षण व ज्ञानप्राप्तीसाठी केले जाते.

### गुरुवार प्रदोष

हे व्रत गुरुवारी प्रदोष असल्यास पितरांचे आशीर्वाद प्राप्त होण्यासाठी, शत्रूवर विजय प्राप्त करण्यासाठी, संकटांचा विनाश करण्यासाठी केले जाते.

### भृगुवारा प्रदोष

हे व्रत शुक्रवारी प्रदोष असल्यास धन, संपदा व सौभाग्यासाठी, जीवनात सफलता प्राप्त करण्यासाठी केले जाते.

### शनी प्रदोष

हे व्रत शनिवारी प्रदोष असल्यास गुणवान पुत्रप्राप्तीसाठी केले जाते. गर्भातील बालकाच्या अडचणी दूर होण्यासाठी केले जाते. नोकरीमध्ये चांगली पदोन्नती होण्यासाठी केले जाते.

### भानु प्रदोष

हे व्रत रविवारी प्रदोष असल्यास जीवनात सुख-शांती लाभावी, दीर्घायू लाभावे, यासाठी केले जाते.

### प्रदोष व्रत उद्यापन

१) पूर्वी पूजा विधीमध्ये सांगितल्याप्रमाणे सर्व तयारी करावी.
२) गणेश पूजन झाल्यावर शंकराच्या प्रतिमेऐवजी उमा-शंकराच्या प्रतिमेचे पूजन करावे.
३) अग्नी प्रज्वलीत करून हवन करताना ' ॐ उमा सहित-शिवाये नमः ' या मंत्राच्या उच्चाराने कमीत कमी १०८ आहुती द्याव्यात, त्यानंतर पूर्णाहुती द्यावी.
४) नैवेद्य दाखवावा. आरती म्हणावी.
५) ब्राह्मण, मेहुण जेवावयास घालावे.
६) त्यांचे जेवण झाल्यानंतर त्यांचे आशीर्वाद घेऊन स्वतः परिवारासह भोजन करावे.

# मंगळसूत्र - एक दिव्य अलंकार : आध्यात्मिक विवेचन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीत अलंकार म्हणजे केवळ सौंदर्याची वस्तू नव्हे. ऊर्जा, श्रद्धा आणि संस्कारांचा तो धागा आहे. स्त्रीच्या गळ्यातील मंगळसूत्र हे अशा दिव्य अलंकारांपैकी सर्वश्रेष्ठ मानले जाते. ते केवळ दागिना नसून देवत्वाशी जोडणारे सूत्र आहे. शरीराला, मनाला आणि आत्म्याला मंगल करणारा एक आध्यात्मिक बंध आहे.

**१) ' दिव्य अलंकार ' म्हणजे काय?**

' अलंकार ' हा संस्कृत शब्द ' अलं करोति इति अलंकारः ' म्हणजे ' जे जीवनाला अलंकृत करते ते अलंकार '.
जेव्हा एखादी वस्तू सौंदर्यापेक्षा अर्थ, आणि अर्थापेक्षा आध्यात्मिकता देऊ लागते तेव्हा ती ' दिव्य अलंकार ' ठरते.
मंगळसूत्र हे स्त्रीच्या गळ्यात असलेले असेच एक दैवी ऊर्जा-सूत्र आहे. ज्यामध्ये भक्ती, निष्ठा, संरक्षण आणि शांती यांचे तत्त्व गुंफलेले आहे.

**२) मंगळसूत्राचा मूळ अर्थ**

' मंगळ ' म्हणजे शुभ आणि ' सूत्र ' म्हणजे बंधन किंवा एकत्वाचा धागा. म्हणजेच शुभतेशी, ईश्वराशी आणि पतिशक्तीशी जोडणारा धागा. हे सूत्र स्त्रीच्या हृदयाजवळ असते. म्हणजेच तिच्या प्राणउर्जेच्या केंद्रावर. त्यामुळे हे केवळ भावनिक नव्हे, तर ऊर्जात्मक बंधन आहे.

**३) दिव्यता कुठून येते?**

प्रत्येक मणी, सोन्याचे प्रत्येक कण आणि काळ्या मण्यांतील प्रत्येक स्पंदन हे स्त्रीच्या चित्त, प्राण आणि मनोबलाशी संवाद साधतात. हीच ती दिव्यता.
**सोने :** सूर्यतत्त्वाचे प्रतीक जीवनशक्ती, तेज आणि आनंद.
**काळे मणी :** भूतदोष, दृष्टिदोष आणि नकारात्मक उर्जेपासून संरक्षण.
**सूत्र :** शिवशक्तीचे संतुलन दर्शवणारे पती-पत्नीतील आध्यात्मिक एकत्वाचे प्रतीक.
' यत्र स्त्री पूज्यते तत्र देवताः रमन्ते ' मनुस्मृती
जेथे स्त्री पूजनीय आहे, तेथे देवत्व स्वतः वास करते.

**४) ' दिव्य अलंकार ' म्हणून मंगळसूत्राचा प्रभाव**

१. मनशांती- दररोज मंगळसूत्राला नमस्कार केल्याने हृदयातील चंचलता शांत होते.
२. ग्रहशांती- मंगळ, शुक्र आणि राहूच्या प्रभावावर नियंत्रण येते.
३. ऊर्जा संतुलन- काळे मणी नकारात्मक ऊर्जा शोषून घेतात. सोने सकारात्मक ऊर्जा प्रसारित करते.
४. दैवस्मरण- हा अलंकार देहाला नव्हे, आत्म्याला सजवतो.

**५) उपासना आणि साधना**

मंगळसूत्राला केवळ अलंकार न मानता ध्यानाचे माध्यम बनवावे. दररोज सकाळी अंघोळीनंतर उजव्या हाताने मंगळसूत्राला स्पर्श करून म्हणावे-
**' ॐ मंगळाय नमः।**
या माळेतील प्रत्येक मणी माझे रक्षण करो।
या सोन्यातील तेज माझे जीवन मंगल करो।'
ही साधना आत्मविश्वास, पतीप्रेम आणि स्थैर्य वाढवते.

**6) दिव्यतेचे रहस्य ' बंधन नव्हे, पूजन '**

मंगळसूत्र हे पतीच्या अधिकाराचे चिन्ह नव्हे, तर ईश्वराने दिलेल्या कर्तव्याचे स्मरणचिन्ह आहे. हे बंधन नाही, तर पूजन आहे. ज्यावेळी स्त्री मंगळसूत्राला दिव्यतेने ओळखते त्यावेळी तिचा पती फक्त मानव न राहता ईश्वराचा अंश भासतो. ती स्वतः शक्तिरूपा बनते.

**७) आध्यात्मिक सूत्र- शिवशक्ती एकत्वाचे प्रतीक**

मंगळसूत्र हे ' शिव' (चैतन्य) आणि ' शक्ती ' (क्रिया) यांच्या मिलनाचे भौतिक प्रतीक आहे.
जसे वेदांत सांगतो-
' शिवः शया युक्तो यदि भवति शक्तः प्रभवितुं। '

**८) शिवशक्तीचे हे एकत्वच**

गृहस्थाश्रमाचे आध्यात्मिक तत्त्व आहे. मंगळसूत्र स्त्रीला हे स्मरण करून देते, की तिचा विवाह हा फक्त देहसंयोग नसून आत्मसंयोग आहे. एकमेकांच्या आत्म्यात ईश्वराचे दर्शन घडविणारा बंध.
अर्थ :
काळे मणी- अज्ञान, दृष्टिदोष, वासनांचे शमन.
सोने- ज्ञान, तेज आणि देवत्वाचे तत्त्व.
सूत्र- दोघांमधील समरसतेचा ' सुषुम्ना नाडी 'समान दैवी प्रवाह.
दर सकाळी मंगळसूत्राला नमस्कार करून ' ॐ नमः शिवाय ' जप करणे म्हणजे गृहस्थाश्रमातील ईश्वरध्यान.

**९) अधिभौतिक सूत्र- ऊर्जा संतुलन आणि संरक्षण**

अधिभौतिक स्तरावर मंगळसूत्र हे एक ऊर्जामय यंत्र आहे. स्त्रीच्या हृदयाजवळ असलेले हे सूत्र तिच्या अनाहत चक्राशी जोडलेले असते. येथूनच प्रेम, करुणा आणि निष्ठा ही ऊर्जा प्रसारित होते.
काळे मणी- निगेटिव्ह ऊर्जा शोषून घेणारे ' रक्षक कवच '.
सोने- सूर्याच्या तेजाशी संबंधित सकारात्मक कंपने वाढवते.
धागा- सूक्ष्म नाड्यांसारखा ऊर्जा प्रवाह एकसंध ठेवतो.
म्हणूनच जेव्हा स्त्री संतुलित मनाने मंगळसूत्र धारण करते तेव्हा तिच्या शरीरात शांतता, स्थैर्य, आणि चैतन्याचा प्रवाह निर्माण होतो. हेच अधिभौतिक संरक्षण कवच आहे. जे बाह्य ग्रहदोष, दृष्टिदोष आणि असंतुलनापासून तिचे रक्षण करते.

**१०) पारमार्थिक सूत्र-**

देवत्वाच्या अनुभूतीकडे नेणारे साधन पारमार्थिक दृष्टिकोनातून मंगळसूत्र हे ' सूत्रधार ' आहे. जे देह आणि आत्मा, संसार आणि मोक्ष, प्रेम आणि परमात्मा यांना एकत्र बांधते.
' न तस्य प्रियं वा अप्रियं वा ' उपनिषद (ज्याला सर्वांत एकत्व दिसते, त्याच्यासाठी कोणी आपला, कोणी परका नाही.)
मंगळसूत्र स्त्रीला या सत्याची आठवण करून देते, की प्रेम म्हणजे अधिकार नव्हे, अर्पण आहे. जेव्हा ती या सूत्राचा अर्थ जाणते तेव्हा ती ' पतिव्रता ' नव्हे तर परमात्मव्रता बनते. त्या क्षणी तिच्या मनात पती नव्हे, तर त्यामधील परमेश्वर प्रकट होतो. हेच पारमार्थिक स्वरूप मंगळसूत्र हे मोक्षमार्गाचे एक गुप्त साधन आहे. मंगळसूत्र हे स्त्रीच्या सौंदर्याचे नव्हे, तर तिच्या साधनेचे दैवी प्रतीक आहे. ते ' गृहिणी 'ला ' गृहलक्ष्मी ' बनविते. त्याचे स्पर्श, त्याची ऊर्जा आणि त्याचा भावार्थ सर्व मिळून स्त्रीच्या अंतःकरणात देवत्व जागृत करतात.
' अलंकारं न भारं भवेत्,
अलंकारं साधनं भवेत्।"
अलंकार हे ओझे नसावे, ते साधनेचे साधन असावे.

